## छंद पुष्परचनेचा - इकेबाना ४

**नॅगेरी रचना -------**

मोरीबाना रचानांच्या थोडा जवळचा असणारा असा हा पुष्परचनेचा दुसरा प्रकार ! नॅगेरी रचनांची दोन वैशिष्ठ्ये आहेत.

१. ह्या रचना उंच व छोट्या तोंडाचे पुष्पपात्र वापरुन केलेल्या असतात.

२. रचना करताना पिन होल्डर किंवा फ्लोरल स्पंज (ओऍसिस) या दोन्हीचा वापर केला जात नाही.

५०० वर्षापूर्वी जेव्हा जपानमध्ये पुष्परचना करायला सुरुवात झाली तेव्हा पिन होल्डर किंवा फ्लोरल स्पंजची निर्मितीच झाली नव्हती. तेव्हा या दोनही गोष्टी न वापरता रचना केल्या गेल्या. काही विशिष्ठ पद्धतीने फुले पाने पुष्पपात्रात बसविण्याचे तंत्र विकसित केलेले होते. पुष्पपात्राचे तोंड लहान असल्यामुळे अशा प्रकाराने रचना करणे सोपे जाते.

पुष्पपात्राच्या वरच्या निमुळत्या भागामध्ये जाड झाडाच्या खोडाचे तुकडे बसवुन किंवा फुला पानांचे देठ पुष्पापात्रात लावताना देठाला खोडाचा तुकडा आडवा बांधुन ते पुष्पपात्रात बसविले जाते.

नॅगेरी व मोरिबाना रचनांमध्ये पुष्कळ साम्य आहे. नॅगेरी रचनांमध्येही शिन या फांदीच्या नैसर्गिक वळणानुसार चोकुताई, शाताई व सुईताई असे प्रकार मोरिबाना रचनांप्रमाणे आहेत. शिन,सोय,ताय या फांद्यांची ऊंची, त्यांचा पुष्पपात्राशी केलेला कोन ,अशिरायचा वापर हे सर्व नियम मोरिबाना रचनांप्रमाणेच आहेत. (मोरिबाना रचनांची माहिती मे २०११ च्या अंकात पहावी)

१.चोकुताई नॅगेरी (फोटो१) -




सोबतच्या फोटोमध्ये जांभळ्या रंगाचे  सर्वात ऊंच आयरीस हे शिन, त्यामागचे उजवीकडचे सोय व डावीकडचे छोटे आयरीस ताय म्हणून वापरले आहे. नाजुक लव्हेंडर रंगाचे कॅस्पिया व लाल स्वीट विलियम हे आशिराय म्हणून वापरले आहे. नैसर्गिकरित्या सरळ वाढणारी फुले पाने यात वापरली जातात.

२. शाताई नॅगेरी (फोटो २) -




गुलाबी फुलांच्या फांद्या शिन व सोय आहेत. कॅलेथियाची पाने ताय म्हणून वापरली आहेत. जांभळॆ ऍस्टर अशिराय आहे. थोडा बाक किंवा वळण असणाऱ्या फांद्या या प्रकारात वापरतात.

३. सुईताई नॅगेरी (फोटो३) -




वेली किंवा त्याप्रमाणे असणाऱ्या झाडांचा उपयोग या प्रकारात आढ्ळतो.

सोबतच्या फोटोत पिवळ्या फुलांच्या फांद्या शिन,सोय व ताय म्हणून वापरल्या आहेत. जांभळ्या रंगाची पॅन्सी आशिरायचे काम करते.

सौ.अरुंधती देशपांडे

मेंबर, इकेनोबो इकेबाना फ्लोरल आर्ट,जपान

asdssd@gmail.com

(मराठी विश्व,न्यूजर्सी यांच्या सौजन्याने)